# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**

**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक - १२४/२०२०/नाशिक**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. राहुल चंद्रकांत भारती,<br>रा.२०, श्री जी अर्पण, इंदिरा नगर,<br>नाशिक-९. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा,<br>अधीक्षक (सारासे वर्ग-२),<br>प्राथमिक शिक्षण विभाग,<br>जिल्हा परिषद, नाशिक | : | प्रतिवादी |
| २ | प्रथम अपिलीय अधिकारी तथा,<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद नाशिक,<br>ता.जि.नाशिक. | : | प्रतिवादी |

**ऑनलाईन सुनावणी दिनांक – ०५/०१/२०२२**

अपिलार्थी यांनी दिनांक ३०/१२/२०१९ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. त्यामध्ये दिनांक ०५/०१/२०२२ रोजी meet.google.com/uwb-foqx-esm या गुगल मिट कोडद्वारे आयोजित ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित होते. विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित होते. तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. तत्कालीन व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते.

सुनावणीदरम्यान तत्कालीन जन माहिती अधिकारी आणि तत्कालीन व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी हे कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्वपरवानगी न घेता संयुक्तिक कारणाशिवाय अनुपस्थित आहेत. वास्तविक सामान्य प्रशासन विभागाने शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दिनांक ०१/१२/२०१५ नुसार खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:-

"माहिती उपलब्ध करुन देण्यानुषंगाने संबंधित जन माहिती अधिकाऱ्याने तसेच प्रथम अपिलीय अधिकाऱ्याने माहिती उपलब्ध करुन देण्यात हेतुपुरस्सरपणे टाळाटाळ केल्याचे निदर्शनास आल्यास त्याची गंभीर दखल घेतली जाईल. द्वितीय अपील सुनावणीत तत्कालीन जन माहिती अधिकारी, आयोगाने आदेशित केले असल्यास प्रथम अपिलीय अधिकारी तसेच इतर संबंधित अधिकारी आयोगाच्या पूर्वपरवानगीशिवाय किंवा

कोणतीही लेखी सूचना न देता द्वितीय अपिलाच्या सुनावणीस गैरहजर राहिल्यास आवश्यकतेनुसार त्यांच्यावर नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल."

शासनाच्या अशा स्पष्ट सूचना असतानादेखील तत्कालीन जन माहिती अधिकारी आणि तत्कालीन व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित असल्याने त्यांच्याविरुध्द कारवाई करणे आवश्यक आहे.

अपिलार्थी यांनी द्वितीय अपील अर्जात नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक ३०/०९/२०१९ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती पुरविली नाही. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही. त्यामुळे प्रस्तुत द्वितीय अपील दाखल करावे लागले.

सुनावणीदरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांचा दिनांक ३०/०९/२०१९ रोजीचा माहिती अर्ज दिनांक ०९/१०/२०१९ रोजी प्राप्त झाला होता. सदर माहिती अर्जान्वये दिनांक २३/०८/२०१९ ते दिनांक ३०/०९/२०१९ या कालावधीतील अपिलार्थी यांच्या सोबत जोडलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. त्यास अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २४/१०/२०१९ रोजीच्या पत्रान्वये मागितलेली माहिती निरंक असल्याबाबत कळविले. तद्नंतर अपिलार्थी यांनी दिनांक ०५/११/२०१९ अन्वये प्रथम अपील दाखल केले.

सुनावणीदरम्यान द्वितीय अपिलाच्या अनुषंगाने दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून आले की, अपिलार्थी यांनी दिनांक ०५/११/२०१९ अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १२/१२/२०१९ रोजी निर्णय पारीत करुन जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य ठरवून तसेच अपिलार्थी प्रथम अपील सुनावणीस गैरहजर असल्याचे नमूद करुन प्रथम अपील निकाली काढले.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, अपिलार्थी यांच्या दिनांक ३०/०९/२०१९ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती निरंक असल्याबाबत वस्तुस्थितीदर्शक उत्तर पुरविल्याचे स्पष्ट होते. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे दिसून येत नाही, ही बाब विचारात घेता अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये केलेली कार्यवाही योग्य असून प्रस्तुत अपिलात काहीही तथ्य नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांना सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दिनांक ०१/१२/२०१५ नुसार असे आदेश

देण्यात येत आहेत की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता तत्कालीन जन माहिती अधिकारी आणि तत्कालीन व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी, अनुक्रमे श्रीमती वैशाली झनकर व श्री.राजीव म्हसकर द्वितीय अपील सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांच्याविरुध्द उपरोक्त परिपत्रकानुसार कार्यवाही करण्यात येवून त्याबाबतचा अहवाल आयोगास सादर करावा.

२) वरील निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक १२४/२०२०/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

**(समीर सहाय)**
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक, ता.जि.नाशिक.

यांनी आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधित अधिकारी यांना हस्तांतरीत करुन पोच उलटटपाली आयोगाला सादर करावी. तसेच आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करुन अहवाल ३० दिवसांचे आत सादर करावा.